CMYK

सुविचार

जीवनातील प्रत्येक दिवस नवीन संधी घेऊन येतो, त्याचा लाभ घ्या.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com




चार हजार वृक्षांचे संगोपन
पेज ४

■ दैनिक ■धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 86 ■ बुधवार दि.7मे 2025 ■ RNI NO-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# तुळजापूरचा कायापालट होणार; १८६६ कोटींच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मंत्रिमंडळाची मान्यता

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सरकारचे आभार

आरंभ मराठी / धाराशिव

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या तीर्थक्षेत्र तुळजापूरचा आता पूर्णतः कायापालट होणार आहे. तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने १८६६ कोटी रूपयांच्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास शिखर समितीसह मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. विकास आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मान्यता मिळाली असून, आपण केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे, महायुती सरकारने मोठे पाठबळ दिल्याबद्दल राज्य सरकारचे मनापासून आभार मानत असल्याचे मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे की, कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्रविकासासाठी व्यापक विकास आराखड्याची व्यापक संकल्पना आपण मांडली होती. महायुती सरकार आल्यानंतर प्राधान्याने हा विषय मार्गी लागला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सुरुवातीपासून या महत्त्वाच्या आराखड्याकडे व्यक्तिशः लक्ष होते. मागील महिन्यात तुळजापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी जीर्णोध्दाराच्या कामांची पाहणी केली होती.



आराखड्याचे सादरीकरण पाहत सर्व बाबी अत्यंत गांभीर्याने जाणून घेत काही महत्वाच्या सूचनाही केल्या होत्या व तत्वतः मंजुर देखील केला होता. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे आई तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा महत्वपूर्ण प्रकल्प मार्गी लागला आहे. पुढील तीन वर्षांच्या आत ही सगळी कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने या आराखड्यास आता अंतिम मंजुरी दिली असून त्यासाठी महायुती सरकारसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे आभारही आमदार पाटील यांनी मानले आहेत.

## काय आहे आराखड्यात..?



तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात मुख्य दर्शन मंडपासह तेथील अनुषंगिक सोयी-सुविधांचा समावेश असणार आहे. श्री.तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत असतानाचा १०८ फुटाचे भव्य शिल्प जाणार आहे. त्याचबरोबर घाटशीळ, सोलापूर महामार्ग, हडको आदी ठिकाणी भक्तनिवास, प्रसादालय, पुस्तकालय, भोजनालय आणि भाविकांसाठी विविध सोयी-सुविधांचे सुसज्ज केंद्र तयार केले जाणार आहे. तसेच वाहनतळ आणि वृंदावन गार्डनप्रमाणे अत्याधुनिक उद्यानही साकारले जाणार आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या वृध्द व दिव्यांग भाविकांकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचाही यात अंतर्भाव करण्यात आला आहे. अंतिम विकास आराखड्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता देखील मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद यात करण्यातआलीआहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यात, जिल्ह्यात ३३२ नवे सदस्य निवडले जाणार

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे सर्वपक्षीय इच्छुकांच्या आशा पल्लवित

आरंभ मराठी / धाराशिव

तब्बल तीन वर्षे न झालेल्या जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि.६) दिलेल्या निर्णयामुळे निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे निवडणुकीकडे डोळे लावून बसलेल्या सर्वपक्षीय इच्छुकांना दिलासा मिळाला आहे . पुढील चार महिन्यात म्हणजे सप्टेंबर महिन्याच्या पूर्वी जिल्हा परिषद, नगर परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. पुढील चार आठवड्यात निवडणुकांची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापणार आहे. जिल्ह्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तब्बल ३३२ जागा रिक्त असून, त्याजागी आता नवीन सदस्य निवडून येणार आहेत.लोकसभेनंतर सहा महिन्यात विधानसभा निवडणुका पार पडल्या. विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपसह महायुतीचा मोठा विजय झाला. त्यामुळे रखडलेल्या जिल्हा परिषद, नगरपालिका व पंचायत समितीच्या निवडणुका लगेच होतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षण मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयात अडकल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी महत्वपूर्ण (दि.६) सुनावणी होती. सुनावणीत अखेर सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यात घेण्याचा आदेश दिला. तसेच पुढील एक महिन्यात राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यासही सांगितले. त्यामुळे ऐन पावसाळ्यात जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात २५ फेब्रुवारीला यासंबधी सुनावणी झाली होती. त्यावेळी ६ मे ही तारीख न्यायालयाने दिली होती. गेल्या दोन वर्षांपासून सुनावणीची तारीख सतत पुढे ढकलली जात असल्याने माजी नगरसेवक व इच्छुकांची धाकधूक वाढली होती. अखेर ६ मे रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात निवडणुका घेण्याचा निर्णय दिला. यावेळी २०२२ च्या ओबीसीच्या आरक्षणानुसार निवडणुका घेण्यास सांगितले आहे. पुढील एक महिन्यात अधिसूचना प्रसिद्ध केली तरी निवडणुकीसाठी हा कालावधी पुरणार का? तसेच पावसाळा असल्यामुळे निवडणुकांची तयार पूर्ण होणार का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यामुळे आता प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषद, नगर परिषद आणि पंचायत समितीत पुन्हा एकदा राजकीय आखाडे पेटणार आहेत. सर्वपक्षीय इच्छुकांची प्रतीक्षा आता संपली आहे.

### निवडणुकीपुर्वीच धाराशिवचा राजकीय आखाडा पेटला

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निर्णय दिला असला तरी त्यापूर्वीच धाराशिव जिल्ह्यातील राजकीय आखाडा पेटला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या कामांना दिलेली स्थगिती, शहरातील १४० कोटींच्या अंतर्गत रस्त्यांच्या कामावरून पेटलेला वाद आणि कचरा डेपो प्रकरणावरून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी यांमुळे मागील दोन आठवड्यापासून धाराशिवचा राजकीय आखाडा चांगलाच तापलेला आहे. यामध्ये शिवसेना (उबाठा) आणि भाजपा यांच्यातच सामना रंगलेला आहे. बाकी शिवसेना शिंदे गट, दोन्ही राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे पक्ष सध्या फक्त बघ्याच्या भूमिकेत आहेत. पुढील चार महिन्यात निवडणूका होणार असल्याने शहराच्या विकासाच्या स्थानिक मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोपांची ही मालिका अशीच सुरू राहणार आहे.

### धाराशिव जिल्ह्यातील ३३२ जागा रिक्त

धाराशिव जिल्ह्यात एक जिल्हा परिषद, ८ नगर परिषदा, २ नगर पंचायती, ८ पंचायत समित्या अशी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या आहे. यापैकी लोहारा व वाशी नगर पंचायतीची निवडणूक प्रक्रिया पार पडलेली आहे. परंतु, उर्वरित ठिकाणी अडीच वर्षांपासून प्रशासकराज आहे. धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ५५, आठ नगर पालिकेच्या १६७ आणि ८ पंचायत समितीच्या ११० अशा ३३२ जागा रिक्त आहेत.

### अशी आहे जिल्ह्यातील रचना

| | |
|---|---|
| जिल्हा परिषद | ५५ सदस्य |
| धाराशिव न.पा. | ३९ |
| तुळजापूर न. पा. | २१ |
| परंडा न.पा. | १७ |
| भूम न. पा | २२ |
| कळंब न. पा. | १७ |
| नळदुर्ग न. पा | २१ |
| मुरूम न.पा | १७ |

### जिल्ह्यातील रिक्त आकडेवारी

जिल्हा परिषद सदस्य - ५५

नगरसेवक - १६७

पंचायत समितीसदस्य-११०

# पळसपला पाणीटंचाईच्या तीव्र झळा; महिन्यातून एकदाच नळाला पाणी



आरंभ मराठी / पळसप

धाराशिव तालुक्यातील पळसप येथे अनेक भागात पिण्याच्या पाण्याबरोबरच सांडपाण्याचीही टंचाई निर्माण झाली आहे. दारातील नळाला एक एक महिना पाणी येत नसल्याने येथील नागरिक पाणी टंचाईच्या समस्येने त्रस्त आहेत. हीच परिस्थिती मागील दोन महिन्यापासूनची आहे. सद्या मे महिना सुरू आहे. उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात आहे. सिंचनाचे साठे कमी होत चालले आहेत. त्यामुळे नागरिकांना उष्णते बरोबरच पाण्याच्या संकटांना तोंड द्यावे लागत आहे. मागील दोन वर्षांपासून गावात पाणी पुरवठयासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाल्याचे सांगण्यात येते. तरीही गावकऱ्यांना पुरेसे पाणी वेळवर मिळत नाही. काही ठिकाणी बोअरवेल असल्याने अपुरे का होईना दोन तीन दिवसाला चार दोन घागरी पाणी मिळते. त्यातच समाधान मानावे लागते. परंतु गावात काही ठिकाणी पाण्याची कसलीच व्यवस्था नाही. काहीजण आपल्या आपल्या परीने खाजगी टँकरने पाणी विकत घेतात, तर काहीजण पाण्यासाठी गावभर वणवण फिरताना दिसतात. परिणामी पाण्यासाठी अनेक वेळा गावातील महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर घागर मोर्चे देखील काढल्याचे महिलांकडून सांगण्यात आले. गावातल्या सरकारी विहिराला पाणी आहे तर लाईट नाही, लाईट आहे तर पाणी नाही. सौरपंप आहेत तर बसवलेले नाहीत आणि या सर्व गोष्टी आहेत तर त्याला पाहायला कोणी नाही अशी काहीशी अवस्था निर्माण झाली आहे. गावचे सरपंच जिल्ह्यावर राहतात पंधरा पंधरा वीस वीस दिवस ते गावाकडे फिरकत नाहीत. गावातील जनतेला पिण्यासाठी पाणी आहे का नाही, गावतील पाण्याचे सोर्स आटले का कसे? हेही सरपंचांना माहिती नाही. ग्रामपंचायतच्या ढिसाळ नियोजनाअभावी गावकऱ्यांना मात्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मिळणार दोन गणवेश

## एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता;शाळा स्तरावर स्टॉक रजिस्टर

आरंभ मराठी / धाराशिव

नवीन शैक्षणिक वर्षात गणवेश पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी दोन गणवेश वितरीत करण्यात यावेत. त्यानुषंगाने शिक्षण विभागाने आपल्या स्तरावर योग्य नियोजन करुन कार्यवाही करावी. लाभार्थी विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांना गणवेश मिळाल्याबाबत शाळा स्तरावर स्टॉक रजिस्टर ठेवून त्यावर विद्यार्थी व पालकांची सही घेण्यात यावी, असे आदेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले आहेत. त्यामुळे यावर्षी विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शालेय गणवेश मिळणार आहे.जुने शैक्षणिक वर्ष नुकतेच संपले आहे. तर नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास दीड महिन्याचा अवधी आहे. मात्र गेल्यावर्षी मोफत गणवेश योजनेचा पुरता बोजवारा उडाला होता. त्यामुळे यावर्षी शिक्षण विभागाने आतापासून मोफत गणवेश योजनेचे नियोजन सुरु केले आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश देण्याचे उद्दीष्ट प्रशासनाने समोर ठेवले आहे. शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी शाळास्तरावर वाटप करण्यात आलेल्या गणवेशाची रॅन्डम पध्दतीने केंद्रातील २ ते ३ शाळांची तपासणी करावी. तपासणीमध्ये गणवेशाचे कापड निकृष्ट दर्जाचे आढळल्यास संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस कापड बदलून घेण्याच्या सूचना वेळीच द्याव्यात. सूचनेप्रमाणे कार्यवाही होत नसल्यास संबंधित शाळा व्यवस्थापन समितीवर जबाबदारी निश्चित करावी. गणवेश शिलाई पक्क्या धाग्याची असावी. शिलाई निघाल्यास गणवेशाचे कापड फाटल्यास अथवा गणवेशाबाबत कोणतीही तक्रार उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर राहिल. प्रति लाभार्थी एक गणवेशासाठी ३०० रुपयांपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही. याबाबतचीही दक्षता देखील संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने घेणे आवश्यक आहे. ३०० रुपयांपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो खर्च मान्य केला जाणार नाही. गणवेश वितरणामध्ये विलंब होणार नाही. गणवेश पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची संबंधित शाळा व्यवस्थापन समिती, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे, अशा सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिल्या आहेत.





### शाळास्तरावर होणार अंमलबजावणी

प्राथमिक क्षणाधिकाऱ्यांनी सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्या गटातील संबंधित शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक घेऊन समग्र शिक्षांतर्गत मोफत गणवेश वितरणाबाबत योग्य मार्गदर्शन करावे अशाही सूचना देण्यात आल्यामुळे मे महिन्यात गणवेशासंबंधी हालचाली सुरू करण्यातआल्याआहेत.

# कर्ज परतफेड न करणाऱ्या २ कर्जदाराच्या जमिनीचा लिलाव, खरेदीदाराला दिला जमिनीचा ताबा

## प्रगती पतसंस्थेच्या थकबाकीदारांवर पतसंस्था फेडरेशनची कारवाई

आरंभ मराठी / धाराशिव

शहरातील प्रगती पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड न झाल्याने पतसंस्था फेडरेशनने कर्जासह जामीनदाराच्या जमिनीचा लिलाव करून संबंधित खरेदीदाराला जमिनीचा ताबा दिला. दोन कर्जदाराच्या प्रकरणात पतसंस्था फेडरेशनने ही प्रक्रिया २ मे रोजी केली आहे. येथील प्रगती सहकारी पतसंस्थेकडून ओंकार शिवाजी चपने (रा.धाराशिव) यांनी १० वर्षापूर्वी कर्ज घेतले होते.त्यांच्या कर्जासाठी जामीनदार म्हणून शिवाजी सदाशिव चपने यांची कामेगांव शिवारातील जमीन तारण देण्यात आली होती. तसेच पोपट देविदास जाधव (रा.जाधववाडी) यांनी धाराशिव शिवारातील जमीन प्रगती पतसंस्थेला तारण ठेवून कर्ज घेतले होते. मात्र दोन्ही कर्जदारांनी कर्जाचा भरणा न करता थकबाकी ठेवल्याने व वारंवार बँकेने सूचना देऊनही कर्ज भरणा केला नाही. त्यामुळे जिल्हा सहकारी पतसंस्था सहकारी संघाचे (फेडरेशन) विशेष वसुली अधिकारी तथा सल्लागार डी.जी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर लिलाव करून ओंकार चपने यांचे जामीनदार व दुसरे कर्जदार पोपट देविदास जाधव यांच्या जमिनीचा लिलाव करून खरेदीदारास जमिनीचे खरेदीखत करून देण्यात आले तसेच लिलांवातील खरेदीदार यांना पोलीस संरक्षणात जमिनीचा ताबा देण्यात आला. फेडरेशन स्थापनेच्या




उद्देशाप्रमाणे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांचे थककर्जाचे वसुलीसाठी फेडरेशनचे विशेष वसुली अधिकारी सतीश विश्वासराव पाटील, जयजित बुध्दीवंत अम्माशेटे यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ११६० चे कलम १५६ नियम १०७ नुसार अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे फेडरेशनचे कामकाज चालु आहे. त्यांच्याकडून प्राप्त अधिकारात नमुद पतसंस्थेचे थकीत कर्जदार यांचेविरूध्द पतसंस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम ११६० चे कलम १०१ नुसार प्राप्त झालेले वसुली दाखले पतसंस्थेने फेडरेशनकडे सुपूर्द केल्याप्रमाणे थककर्जाचे वसुलीसाठी प्राप्त अधिकारात वसुली दाखला बजावणीचे (म्हणजेच ) कारवाईत नमुद केलेल्या त्या गावातील जमिनीची जाहीर लिलावाने विक्री करण्यात आली. खरेदीदारास खरेदीखते लिहून देऊन त्याप्रमाणे सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार खरेदीदारास जमिनीचा ताबा देण्यासाठी विशेष वसुली अधिकारी यांच्याकडे ताबा देण्यात यावा असा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदार यांना जमिनीचा ताबा देण्याचे आदेश निर्गमित केले. या कारवाईमध्ये फेडरेशनचे व्यवस्थापक श्रीकांत गोरे तसेच फेडरेशनचे विशेष वसुली अधिकारी यांनी केलेल्या कामाचे फेडरेशनचे अध्यक्ष सतीश दंडनाईक यांनी कौतुक केले. फेडरेशन स्थापनेचा उद्देश सफल झाला, कलम १०१ वसुली दाखले देण्यासाठी सहाय्यक निबंधक यांच्या सहकार खात्यातून डेप्युटेशन करून घ्यायचे पूर्ण नियोजित आहे. दरम्यान, या प्रक्रियेनंतर प्रगती पतसंस्थेचे चेअरमन प्रशांत पाटील व व्यवस्थापक मोहन सावंत यांनी फेडरेशनचे आभार मानले. यावेळी चेअरमन म्हणाले की थकबाकीदार कर्जदार यांनी आपल्याकडील थककर्जाचा त्वरित भरणा करून पतसंस्थेस सहकार्य करावे तसेच आपल्यावर थककर्ज वसुलीसाठी येणारे कटूप्रसंग टाळावे.

CMYK

# मानवी वर्तन- न सुटणारे कोडे

"तू असं का वागतो?", "तुझे सर्व निर्णय का फसतात ?", "तुला काही डोकं आहे की नाही?", "तुझ्या मनात नेमकं काय चाललेलं असतं?" असे अनेक प्रश्न आपण एखाद्या अविचारी व्यक्तीला विचारून त्याला भंडावून सोडतो. सतत चुका करणाऱ्याला आपण कधी कठोर बोलून, तर कधी गोडीगुलाबीने समजावून सांगतो, त्याला वाईट वर्तनापासून परावृत्त करण्याचा मनापासून प्रयत्न करतो. सतत व्यसन करणारे,भांडण-हाणामारी करणारे, अभ्यास न करणारे विद्यार्थी, असभ्य वर्तन करणारे, फसवणूक करणारे, चंगळवादी वृत्ती असणारे, उद्धट, उन्मत्त आणि बेजबाबदारपणे वागणे अशा दूरवर्तन करणाऱ्या व्यक्तींना समजावून सांगणे हे खरेच एक दिव्य कार्य आहे. मानवी वर्तनात बदल घडवण्यासाठी नेमकं काय केलं पाहिजे, याचे ठोस तंत्र अद्याप विकसित झालेले नाही. माणसाच्या मेंदूची रचना, त्यामधील रसायनांचे स्त्राव, यांचा अभ्यास करून थोड्याशा यशस्वी पद्धती विकसित झाल्या आहेत. मात्र, जसा एखादा आजार मुळासकट बरा करता येतो, तसा वर्तनात बदल घडवण्यासाठी त्या व्यक्तीचा शंभर टक्के



सहभाग गरजेचा असतो. दूरवर्तन करणारी व्यक्ती बहुतेक वेळा स्वतःला चुकीचे समजत नाही. काही वेळा त्यांना आपली चूक ठाऊक असते, पण ते मुद्दाम वाईट वर्तन करतात. अशा व्यक्ती -First-order thinking म्हणजेच तात्काळ परिणाम न पाहता फक्त क्षणिक सुख, चैनी, क्रूर भावना, कपट, हिंसा यांवर आधारित निर्णय घेतात.याउलट, -Second-order thinking करणाऱ्या व्यक्ती विचारपूर्वक निर्णय घेतात. अशा व्यक्तींच्या वर्तनाचा काहीसा अंदाज बांधणे शक्य असते. मानसशास्त्रात 'वर्तनवाद' (Behaviorism) ही संकल्पना जॉन वॉटसन यांनी मांडली. त्यांच्या मते मन हा मानसशास्त्राचा अभ्यासाचा विषय नाही, तर वर्तन अभ्यासाचा मुख्य विषय आहे. कारण मन दिसत नाही, पण वर्तन हे दृष्टिगोचर असते. परिसर आणि संस्कार वर्तनावर मोठा प्रभाव टाकतात.वॉटसन म्हणतात, "मला डझनभर निरोगी मुले द्या. मी त्यांना विशिष्ट पद्धतीने वाढवेन आणि त्यांच्यातील एकाला डॉक्टर, दुसऱ्याला वकील, तिसऱ्याला कलाकार, तर एखाद्याला भिकारी किंवा चोर सुद्धा बनवू शकेन." यामध्ये त्यांनी अनुवंशिकतेपेक्षा घडवणुकीचे महत्त्व अधोरेखित केले आहे.बी.एफ. स्किनर या मानसशास्त्रज्ञाने वर्तनवादावर सखोल अभ्यास केला. त्याच्या मते, ज्या वर्तनाचे अनुकूल परिणाम दिसतात, त्याची पुनरावृत्ती होते, आणि ज्याचे प्रतिकूल परिणाम असतात, ते वर्तन टाळले जाते. उदाहरणार्थ, अस्वच्छ परिसरामुळे रोगराई वाढते हे लक्षात आल्यानंतर लोक परिसर स्वच्छ ठेवतात. वृक्षतोडामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असल्याने वृक्षारोपण व संवर्धनाकडे कल वाढतो. अर्थात, कोणाच्या वर्तनावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. स्वतःचे वर्तन स्वतःलाच तपासून, त्यामध्ये बदल घडवावा लागतो, हे मात्र नक्की.आज सोशल मीडियाचा प्रभाव समाजात फार मोठ्या प्रमाणात होत आहे. उजव्या विचारसरणीच्या व्यक्तीला डाव्या विचाराचा किंवा एखाद्या डाव्या विचाराच्या व्यक्तीला उजव्या विचारसरणीचा करण्याची ताकद सोशल मीडियामध्ये आहे. अर्थात



किशोर जाधव, सोलापूर
मानं.९२२८८२५४१

एखाद्या मध्ये पूर्ण वर्तन बदल करण्याची क्षमता सोशल मीडियामध्ये आज आली आहे. तंत्रज्ञानाचा कौशल्याने वापर करून आणि सोबत 'गोबेल्स तंत्र' वापरून ब्रेन वॉश केले जात आहे. यासाठी शाळा कॉलेज यामधून तज्ञ लोकांनी, शिक्षकांनी आणि प्राध्यापकांनी योग्य संस्कार देऊन तरुण आणि विद्यार्थ्यांच्या वर्तनावर होणारे आक्रमण थोपवले पाहिजे. शेवटी मानवी वर्तन हे एक न सुटणारे कोडे जरी असले तरी यावरती अभ्यास आणि संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

# बारावी बोर्ड परीक्षेत परंडा येथील रा.गे.शिंदे महाविद्यालयाचे यश; निकाल ८०.८६ टक्के

आरंभ मराठी / परंडा







इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या निकालात परंडा येथील रा. गे. शिंदे महाविद्यालयाने यश मिळवले आहे. महाविद्यालयातील विज्ञान विभागातून बेग रिहान सत्तार सर्वप्रथम, कला विभागातून शिंदे नम्रता नागनाथ प्रथम तर वाणिज्य विभागातून मोरे अश्विनी विजय प्रथम आले आहेत. विज्ञान विभागातून बेग रेहान सत्तार या विद्यार्थ्याने ८०.५०% मार्क्स घेऊन महाविद्यालयातून सर्वप्रथम क्रमांक पटकाविला. कला विभागातून कुमारी नम्रता नागनाथ शिंदे हिने ७९.६७% मार्क्स घेऊन प्रथम क्रमांक पटकिवला तर, वाणिज्य विभागातून कुमारी मोरे अश्विनी विजय हिने ७५% मार्क्स घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम टिकविली आहे. महाविद्यालयाचा एकुण निकाल ८०.८६ % लागला असुन, विज्ञान विभागातून बेग रिहान सत्तार महाविद्यालयातुन सर्वप्रथम , चव्हाण स्वप्नील बाळकृष्ण याने ७५.८३ टक्के मार्क्स घेऊन व्दितीय क्रमांक पटकाविला तर कांबळे अनविशा कैलास हिने ७५.१७ टक्के मार्क्स घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. कला विभागातून शिंदे नम्रता नागनाथ हिने ७९ .६७ टक्के मार्क्स घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. सोनवणे साक्षी महारुद्र हिने ७६ .१७ टक्के मार्क्स घेऊन व्दितीय क्रमांक पटकाविला तर नलवडे ऋतुजा लक्ष्मण हिने ६७.८३ टक्के मार्क्स घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य विभागातून मोरे अश्विनी विजय या विद्यार्थीनीने ७५ टक्के मार्क्स घेऊन प्रथम क्रमांक पटकावला. गुंडगिरे सृष्टी धनाजी हिने ७०.१७ टक्के मार्क्स घेऊन व्दितीय क्रमांक पटकावला तर बस्के ज्ञानेश्वर किसन याने ६७ टक्के मार्क्स घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. विज्ञान विभागाचा निकाल ९१.५८ कला विभागाचा ६३.३० तर वाणिज्य विभागाचा ७५.५१ टक्के लागला आहे. श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव या संस्थेचे सचिव संजय निंबाळकर, अध्यक्ष सुनील शिंदे तसेच प्राचार्य डॉ. सुनील जाधव, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. किरण देशमुख, महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ. शहाजी चंदनशिवे तसेच महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ विभागाचे सहशिक्षक यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## १९९५ ते २००० बॅच,२५ वर्षानी भेटलेल्या वर्गमित्रांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

आरंभ मराठी /धाराशिव

शहरातील नामवंत व सर्वात जुने कॉलेज असलेल्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील सन १९९५ ते २००० या कालावधीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सोमवारी दि. ५ मे रोजी हॉटेल ॲपल येथे स्नेहमेळावा झाला. तब्बल २५ वर्षांनी वर्गमित्र एकमेकांना भेटल्याने सर्वांचा आनंद द्विगुणीत झाला. धाराशिव शहरातील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात सन १९९५ पासून शिक्षण घेत असलेले व सन २००० मध्ये कॉलेजचा निरोप घेतलेले माजी विद्यार्थी तब्बल २५ वर्षांनी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने सोमवारी एकत्र आले. या मेळाव्यासाठी ठाणे येथे पोलीस दलात कार्यरत आशा भालेराव-मोरे, आरती पाठक-कुलकर्णी (सोलापूर), जगदेवी गाढवे-तावसकर (बार्शी) यांनी पुढाकार घेऊन सर्व वर्गमित्रांना एकत्र येणाचे आमंत्रण दिले. धाराशिव शहरातील हॉटेल ॲपल येथे हा मेळावा झाला. यावेळी कॉलेज जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कोणी प्राध्यापक, शिक्षक, कोणी वकील, पोलीस, कोण व्यवसायिक तर कोणी राजकारणी आदी सर्वच वर्गमित्र मेळाव्याच्या




निमित्ताने एकत्र आले. सर्वांनी स्नेहभोजन करून रामकृष्ण महाविद्यालयाला भेट दिली. ज्या वर्गात शिक्षण घेऊन उच्चपदावर पोहोचलो, त्या वर्गात पुन्हा बसून अभ्यासाचे धडे गिरवले. यावेळी सर्वांचे आवडते प्रा. अभिमान हंगरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कॉलेजमध्ये स्वागत करून मार्गदर्शन केले. मेळाव्याला माजी नगरसेवक प्रदीप मुंडे, विनायक लोकरे, सुभाष कदम-पाटील, ॲड. प्रशांत खंडाळकर, ॲड. संजय बाकले, ॲड. इम्रान गवंडी, पद्मनाभ साबळे, अमोल भदे, शिवराज पाळणे, दत्ता शिंदे, दीपक आवारे, प्रा. रवी वाघे, आरती पाठक, आशा भालेराव, राणी गाढवे, विद्या चव्हाण, मिनाक्षी साखरे, रेखा नागरे, प्रतिभा वाघमारे, सोनाली पाथरकर आदी उपस्थित होते.

# मार्कांवर आयुष्याचे मोजमाप करु नका..

परीक्षेत उत्तम मार्क मिळाले म्हणजे आयुष्यातील सर्वोत्तम यश मिळाले. आता यापुढे काहीच करण्याची आवश्यकता नाही.असा जर विचार करत असाल तर तो चुकीचा आहे. कारण एखाद्या परीक्षेतील गुणांवरुन लगेच आपण मुलांच्या आयुष्याचे मोजमाप करु शकत नाही. ही तर केवळ सुरुवात आहे.मार्कांच्या पलीकडे खूप मोठे आयुष्य असते.त्या आयुष्यात आपण कसे जगतो हे महत्वाचे आहे. शाळेच्या परीक्षेत नापास पण जीवनाच्या परीक्षेत यशस्वी झालेली अनेक माणसे आपल्याला प्रेरक आहेत. आज आपली शिक्षण व्यवस्था परीक्षा आणि मार्क यात अडकली आहे.ज्यांच्या हाती भोपळा होता त्यांनी व्यवहार ज्ञान,अनुभव आणि संघर्ष करुन आपले आयुष्य घडविले. त्यांच्या कागदी मार्कलिस्टवर नापास किंवा कमी मार्क असतील परंतु यशस्वी लोकांच्या यादीत त्यांचे नाव नक्कीच वर असेल.म्हणून जीवनातील यश हे परीक्षेतील मार्कावरुन ठरत नाही तर मनगटातील बळ आणि जिद्दीवर ठरते. भास्कर पेरे पाटील हे सातवी पर्यंत शिक्षण झालेले व्यक्तिमत्त्व परंतु गावाप्रती असणारी तळमळ आणि लोकांच्या मनाला भिडणारे वक्तृत्व याच्या जोरावर आज ते यशस्वी,



कल्पक,सृजनशील लोकांच्या पंगतीत आहेत.आज व्याख्यानाच्या माध्यमातून हजारो लोकांचे प्रबोधन करत आहेत स्वर्गीय वसंतदादा पाटील फक्त चौथी शिकले होते. परंतु त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून लोकांच्या स्मरणात राहिल असा उत्तम कारभार केला.बारावी नापास झालेला मनोजकुमार शर्मा नावाचा तरुण पुन्हा झपाटून अभ्यास करतो आणि आयपीएस होतो. दहावीत नापास झालेले गदिमा आपल्या प्रतिभेच्या जोरावर मराठी साहित्य विश्वात आपले नाव कोरतात.गीतरामायणाद्वारेघराघरात पोहचतात.म्हणजेच मार्कांवर जीवनातील यश ठरत नाही. तुमच्या अंगी असणारे उपजत कौशल्य ,कष्ट करण्याची तयारी, जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन, इतरांपेक्षा वेगळं करण्याची जिद्द असेल तर हातात कोणत्याही पदव्याचे कागद नसताना तुम्ही यशस्वी होऊ शकता. स्वतः बद्दल आत्मविश्वास, माणसं ओळखण्याची कला आणि प्रामाणिकपणे मेहनत केली तर स्वतः चे आयुष्य घडविता येते. आज शिक्षणातून पदव्या मिळतात पण जगण्यास आवश्यकता कौशल्य प्राप्त होत नाहीत ही मोठी खंत आहे.संकटातही न डगमगता उभं राहता आलं पाहिजे. यश अपयशाच्या वेळी संयम ठेवता आला पाहिजे. आयुष्यात चढ उतार येत असतात. म्हणून हतबल होता कामा नये.धैर्याने कोणत्याही समस्येवर मात करता येणं हा कणखरपणा शिक्षणातून अवगत झालं तर एक सक्षम पिढी तयार होईल.



लक्ष्मण जगताप
बारामती.

# जनमित्र, अधिकारी कर्मचाऱ्यांचा सुसंवाद मेळावा उत्साहात

## मंडळ कार्यालयाच्या छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण

आरंभ मराठी / धाराशिव

महावितरण आणि वीजग्राहक यामधील लाईनमन हा अत्यंत महत्वाच दुवा आहे, महावितरणचा तो चेहरा आहे. त्यामुळे लाईनमनच्या वर्तणुकीवरच कंपनीचे यश अवलंबून आहे. त्यामुळे ग्राहकहीत जोपासतच लाईनमननी ग्राहकाभिमूख सेवा द्यावी असे निर्देश महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक तथा कार्यकारी संचालक (पायाभूत आराखडा) धनंजय औंढेकर यांनी दिले.धराशिव येथे शुक्रवारी (दि.२ मे) लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता संजय आडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या सुसंवाद मेळाव्यात जिल्ह्यातील जनमित्र, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्री औंढेकर म्हणाले की, वीजग्राहकांना अखंडीत वीज सेवा दिली तर वीजग्राहक आपल्यापासून दुर जाणार नाही, परिणामी आपण विकलेल्या विजेच्या प्रत्येक युनीटची वसुली करणे सोपे जाते. सेवेप्रति निष्ठावान असलेल्या काही लाईनमनची उदाहरणे देत लाईनमन कसा असावा व कसा असू नये याविषयी मार्गदर्शन केले. तसेच लाईनमनचा गणवेश हा अत्यंत महत्वाचा असून त्यामुळे तूमच्याकडे पाहण्याची एक वेगळा दृष्टी वीज ग्राहकांमध्ये निर्माण होते. मार्च महिन्यात केलेल्या वीजबील वसुलीचे कौतूक करत, केवळ एका महिण्याच्या कामगिरीवर समाधान मानून चालणार नाही, प्रत्यक महिना हा मार्च समजूनच प्रत्येकाने कार्यरत रहायला हवे अशाही सूचना केल्या. त्याचबरोबर १५ मे पर्यंत ३३ केव्ही ११ केव्ही वीजवाहिनीला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची रितसर परवानगी घेवून छाटनी करून घ्यावी. आपली वीजवाहिनी ट्रीप होते की नाही याची संबधीतांनी काळजी घ्यायला हवी. लाईनमनच्या सुरक्षेला प्राधान्य देत सर्व कर्मचाऱ्यांना टीएनटी, रेनकोट, गमबुट, रबरी हातमोजे व पोर्टेबल शिडी देण्याचे आश्वासन औंढेकर यांनी याप्रसंगी दिले. त्याचबरोबर जिल्हयातील वीजगळतीचे प्रमाण पाहता सातत्याने वीजचोरी विरोधात मोहीम राबवावी. कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडीत झालेल्या वीजग्राहकांकडील शेकडो कोटींची थकबाकी थकबाकी लक्षात घेवून पीडी




केलेल्या वीजग्राहकांचे दुसरे कनेक्शन शोधून थकबाकीचा बोजा चालू असलेल्या कनेक्नवर टाकून बील न भरल्यास दुसरे कनेकशनही कट करण्याचे निर्देश दिले. प्रधानमंत्री सुर्यघर योजना व सौर कृषी पंपाच्या योजनेचा लाभ देण्यासाठी निहीत वेळेत अर्ज मंजूर करून जास्तीत जास्त ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न करण्याचेही निर्देश सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांनी दिले. वीजग्राहकांच्या घरात वीज पोहचवण्यासाठी जवळपास साडेआठ रूपये खर्च येतो तो वसूल करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत असे सांगत मार्च महिन्यात थकबाकी शुन्य केलेल्या गावांचे लाईनमन यांचे कौतुक करत सत्कार केला. याप्रसंगी धाराशिव मंडळ कार्यालयाच्या छतावर बसविण्यात आलेल्या १७ किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा पॅनेलचे श्री.औंढेकर यांचे हस्ते लोकार्पणकरण्यातआले.

# स्वाधार योजनेसाठी त्रुटीपुर्ततेची अंतिम मुदत १५ मे पर्यंत

आरंभ मराठी / धाराशिव

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा प्रदान केल्या जातात. या योजनेसाठी अर्ज प्रक्रियेसंबंधी सर्व कामकाज या https://hmas.mahait.org पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने पार पडत आहे. २०२४-२५ या वर्षासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १२० विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीपूर्ण असल्याचे निर्दशनास आले आहे. यासंदर्भात संबंधित विद्यार्थ्यांना फोन व पत्राद्वारे संपर्क साधूनही अद्याप त्रुटीपुर्तता झालेली नाही. तरी अशा विद्यार्थ्यांनी दिनांक १५ मे २०२५ पर्यंत अर्जाची हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रांचा संच समाज कल्याण कार्यालय, धाराशिव येथे जमा करावा.अन्यथा त्यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. अर्ज सादर करताना कोणतीही अडचण असल्यास सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन बाबासाहेब अरवत, सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.

# घनपाठी, शर्मा, देशपांडे, निगुडकर,गवंडी शंकराचार्य पीठाचे मानकरी

आरंभ मराठी /कोल्हापूर

## सात ते बारा मेपर्यंत जयंती उत्सव

येथील श्रीमद जगद्गुरू शंकराचार्य पीठ करवीर पीठाचा जयंती उत्सव येत्या सात ते बारा मे या कालावधीत आयोजित केल्याची माहिती विद्यानृसिंह भारती यांनी दिली. या संदर्भात अधिक माहिती देताना ते म्हणाले, श्रीमद जगद्गुरू आद्य शंकराचार्यांच्या २५३३ व्या जयंती उत्सव निमित्ताने पीठामध्ये आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

यामध्ये जन्मकाळ, कीर्तन, रामायण, हवन, भाव भक्तिगीते अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन तर दररोज होईलच याशिवाय देवतांना अभिषेक, गीताभाष्य, दशोपनिषद वाचन याचे आयोजन केले आहे. स्वामीजी म्हणाले, पीठाचा महत्त्वाचा कार्यक्रम असणारा पुरस्कार वितरण सोहळा ११ मे रोजी आयोजित केला आहे. या पुरस्काराचे वैदिक पुरस्कार ईश्वर घनपाठी (वाराणसी), सांस्कृतिक पुरस्कार दोर्बल शर्मा (हैदराबाद), कीर्तनकार पुरस्कार राघवेंद्र देशपांडे (धाराशीव), स्थानिक वैदिक पुरस्कार प्रसाद निगुडकर (कोल्हापूर), सामाजिक गौरव प्रकाश आनंदराव गवंडी (कोल्हापूर), डॉ. साळवे (पुणे), महिला कीर्तनकार पुरस्कार मानसी बडवे (पुणे), होतकरू विद्यार्थी पुरस्कार यज्ञानंदन कस्तुरे (जालना), वेदार्थ जोशी (आळंदी), उत्कृष्ट शासकीय कर्मचारी पुरस्कार वैभवी अभय दाबके (मुंबई) असे मानकरी आहेत. पीठामध्ये सकाळी दहा वाजता पुरस्काराचे वितरण होईल. यावेळी संभाजी भिडे मार्गदर्शन करतील.



# प्रेरणाज्योत आणि कविता टिलीमिलींच्या पुस्तकांचे थाटात प्रकाशन

आरंभ मराठी/ धाराशिव

कळंब तालुक्यातील शेलगाव (जहागीर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता व लेख यांचे कविता टिलीमिलींच्या आणि प्रेरणाज्योत या दोन पुस्तकांचे प्रकाशन संपन्न झाले. या पुस्तकांचे संपादन सुवर्णा मधुकर शिनगारे यांनी केले आहे व प्रस्तावना प्रा. सुनिता गुंजाळ व डॉ. दयानंद जटनुरे यांनी दिली आहे. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्ष शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील तर मुख्य अतिथी म्हणून जिल्हा प्रशिक्षण व शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे ,कवी - लेखक प्रा.डॉ. अरविंद हंगरगेकर, प्रदीप घुले,डॉ. मधुकर हुजरे,येरमाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून कवी हणमंत पडवळ, केंद्रप्रमुख रवींद्र शिनगारे,शेलगावचे सरपंच नवनाथ तवले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दाजी पाटील यांची उपस्थिती होती. सुवर्णा शिनगारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. यानंतर "प्रेरणाज्योत " आणि "कविता टिलीमिलींच्या " या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व सहभागी बाल कवी - कवयित्री लेखिका, चित्रकार यांचा सन्मान करण्यात आला.यासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमात मिळालेल्या बक्षीसातून शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.यावेळी शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांनी या पुस्तकांचे कौतुक केले आणि मुलांना लिहीतं केल्याबद्दल शिक्षक, पालक यांचे अभिनंदन केले तसेच जिल्हा प्रशिक्षण व शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे यांनी विद्यार्थ्यांनी कुठलीही अडचण आली तरी शिक्षण घेण्यास थांबू नये आणि हे लेखन मुलांना एका समृद्धीच्या वाटेवर घेऊन जाणार आहे, असे त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले. तसेच घुले यांनी पुस्तकांसाठी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या. कवी -लेखक डॉ.अरविंद हंगरगेकर यांनी शेतीमातीच्या कविता विद्यार्थ्यांना गाऊन दाखवल्या. कवी मधुकर हुजरे यांनी दोन्ही पुस्तकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. येरमाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी संतोषजी माळी साहेब यांनी मुलांच्या कवितांचे कौतुक केले आणि गावकरी आणि शाळा यांचा समन्वय चांगला असल्याचे नमूद केले. गौर केंद्राचे केंद्रप्रमुख रवींद्र शिनगारे यांनी प्रेरणाज्योत आणि कविता टिलीमिलींच्या या पुस्तकांबद्दल आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे मार्गदर्शक कवी हनुमंत पडवळ यांनी




कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन करत करत मार्गदर्शक विचार विद्यार्थ्यांसमोर ठेवले.सर्व मान्यवरांनी शाळा , शिक्षक ,विद्यार्थी व पालक यांचे कौतुक, अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. गावातील सर्व ग्रामपंचायत सदस्य ग्रामस्थ पालक आणि विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षकवृंद तसेच गावातील सर्व लहान थोर व माता भगिनी यांनी या कार्यक्रमासाठी आपले योगदान दिले. सोहळ्यातील मान्यवरांचे व उपस्थितांचे अभार शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानोबा मुंडे यांनी मानले.

# 'पायवाटाची सावली' २३ मे रोजी होणार प्रदर्शित

आरंभ मराठी / कोल्हापूर

लेखकाचा खडतर प्रवास पायवाटाची सावली या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा मुंबईत संपन्न झाला. या चित्रपटाचे निर्माते, लेखक, दिग्दर्शक मुन्नावर शमिम भगत, बॉलिवूडमधील सुप्रसिद्ध संगीतकार अनिल बिस्वास यांचे सुपुत्र अमित अनिल बिस्वास या चित्रपटाचे वितरक अकात डिस्ट्रीब्युशनचे संस्थापक चंद्रकांत विसपुते आणि समीर सक्सेना हे उपस्थित होते. हा चित्रपट २३ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होईल.'मीना शमीम फिल्म्स' प्रस्तुत 'पायवाटाची सावली' या चित्रपटाच्या



दिग्दर्शनाची व लिखाणाची धुरा मुन्नावर शमीम भगत यांनी उत्तमरीत्या पेलवली आहे. चित्रपटाच्या निर्मितीची बाजू 'मीना शमीम फिल्म्स'ने सांभाळली आहे. चित्रपटाचे संगीत अमित अनिल बिस्वास यांनी केले आहे. समीर सक्सेना यांनी एक्झिक्युटिव्ह प्रोड्यूसर आणि सिंडीकेशनचे काम केले आहे. या चित्रपटात विजे भाटिया, शाल्वी शाह, रेवती अय्यर, प्रसाद माळी आणि शीतल भोसले असे कलाकार आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

विविध वृत्त...

## मामाच्या गावाला जाऊया .. बीजच बीज रुजवूया



आरंभ मराठी / कळंब

तालुक्यातील शेलगाव जहागीर जि. प. प्रा या शाळेत एक अनोखा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये वर्षभर विद्यार्थ्यांनी सीड बँकेत मिळेल तसे एक एक बी जमा केले. यामध्ये चिंच, कडूलिंब, करंज, चिकू, गुलमोहर, आंबा आशा विविध बिया होत्या. शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी मातीचे छोटे गोळे करून, वर्षभर जमा केलेल्या बियातील एक एक बिया त्यामध्ये घालून, सीड बॉल्स तयार केले. ते बॉल सर्व विद्यार्थ्यांना वार्षिक प्रगती पत्रकाबरोबरच देण्यात आले.या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ लाख रुपयांची आर्थिक मदत

आरंभ मराठी/वाशी



मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून गंभीर व दुर्धर आजार असलेल्या रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत केली जाते असून तालुक्यातील विजोरा येथील रहिवाशी असलेल्या सौ. कोमल योगेश तळेकर त्यांच्यावर मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट औरंगाबाद येथे उपचार चालू होते, त्यांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता होती,त्यामुळे ॲड.कानिफ कानतोडे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाकडे आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव सादर केला आणि पाठपुरावा करून कोमल तळेकर यांना पुढील उपचारासाठी तात्काळ १ लाख रुपये अर्थसाह्य मिळवून देण्यात यश मिळवले,त्याकरिता ॲड.कानिफ कानतोडे यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांचे सहकार्य मिळाले.

## शूर वीर शिवा काशिद जयंती साजरी



आरंभ मराठी / धाराशिव

शूरवीर शिवा काशीद यांच्या जयंतीनिमित्त एमआयडीसी शहरातील शिवा काशिद चौकात पुजन करून अभिवादन करण्यात आले. नाभिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण माने,तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवी कोरे आळणीकर,शहराध्यक्ष गणेश वाघमारे, अँड प्रणित डेकले, किशोर राऊत,दाजी पवार,आप्पा वाघमारे,संताजी चौधरी,पाशाभाई शेख,सुधीर वाघमारे, बाबा गायकवाड,बालाजी सूर्यवंशी,शुभाष वीर, ओंकार बांगर,सुरज भालेकर,गणपती क्षीरसागर,अक्षय माने,बालाजी गोरे,शंकर गोरे,शिवराज सुरवसे यांच्यासह पदाधिकारी समाज बांधव संख्येने उपस्थित होते.

## महास्वयंम पोर्टलवर नोंदणी करून नोकरी व प्रशिक्षणाची संधी मिळवण्याचे आवाहन

आरंभ मराठी / धाराशिव

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या ... या पोर्टलवर नोकरी इच्छुक उमेदवारांनी त्वरित नोंदणी व नुतनीकरण करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिवचे सहायक आयुक्त स.रा. गुरव यांनी केले आहे. या पोर्टलवर नोंदणी केल्यास उमेदवारांना रोजगार मेळावे, कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत ११ महिन्यांचे प्रशिक्षण आणि शैक्षणिक पात्रतेनुसार विद्यावेतन मिळू शकते. शासकीय व खाजगी आस्थापनांनीही महास्वयंम पोर्टलवर नोंदणी करून रिक्त पदांची माहिती अधिसूचित करणे, पात्र उमेदवारांची निवड करणे, तसेच दर तिमाही अखेरीस –१ विवरणपत्र ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे. या सर्व सेवा पोर्टलवर मोफत उपलब्ध आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व नोकरी इच्छुक, कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणारे व युवा कार्य प्रशिक्षणात सहभागी होऊ इच्छिणारे उमेदवारांनी महास्वयंम पोर्टलवर तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई सुडे यांचा सत्कार



आरंभ मराठी / कळंब

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी लातूर येथील ओबीसी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या, तसेच बाभळगाव येथील शाळेच्या मुख्याध्यापिका, महिला संघटक रेखाताई सुडे यांची निवड झाली आहे. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे संस्थापक मार्गदर्शक आमदार बाळाराम पाटील, कायदेशीर सल्लागार ॲड. किल्लारीकर, प्रदेशाध्यक्ष अनिल सर, राज्य सरचिटणीस संतोष भोजने, प्रदेश उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, कार्याध्यक्ष रमेश चव्हाण यांच्या समन्वयातून निवड करण्यात आली. याबद्दल रेखा सुडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिंगोली जिल्हाध्यक्ष लहू राक्षे यांचाही सत्कार करून दोघांनाही पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ ही नोंदणीकृत संघटना असून शिक्षकांचे विविध प्रश्न, समस्या जाणून घेऊन शासन दरबारी त्यावर उपाययोजनासाठी प्रश्न घेऊन लढण्यासाठी दोघांनीही प्रयत्न करणार असल्याचे यावेळी सांगितले.

# तालुकास्तरीय वंशावळ जुळवणाऱ्या समितीस मुदतवाढ

## कुणबी, मराठा कुणबी, कुणबी मराठा जातीची वंशावळ जुळवणार तहसीलदार

बालाजी मुळे / आरंभ मराठी

मुरूड– राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करणे तसेच तपासणीअंती पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती शासनाने निश्चित केलेली आहे. त्यास अनुसरून कुणबी, मराठा कुणबी, कुणबी मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळवण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी तालुकास्तरावर तहसीलदाराच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे.

शासनाने मा न्यायमूर्ती संदीप शिंदे निवृत्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीस दिनांक ३० जून २०२५ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. सदर समितीच्या ३ मार्च २०२५ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये माननीय न्यायमूर्ती संदीप शिंदे निवृत्त यांनी राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वंशावळी जुळवण्याचे कामकाज अद्याप पूर्ण झाले नसल्यामुळे तालुकास्तरीय तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या वंशावळ समिती दिनांक ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शासनाने कुणबी, मराठा कुणबी, कुणबी मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याच्या वंशावळ जुळण्याची कार्यवाही करण्याकरता तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली घटित समिती २३ जून २०२५ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे.

### समिती अडचणी सोडवण्यास नागरिकांना करणार मदत

१) सापडलेले महसुली पुरावे हे सण १८६० ते १९४७ या कालावधी दरम्यानचे असून त्यामध्ये नागरिकांचे नाव व वडिलांचे नाव नमूद असून त्या नावासमोर आडनावाचा उल्लेख नाही त्यामुळे अर्जदारास वंशावळ सिद्ध करण्यास अडचण येत आहे.

२) तत्कालीन नागरिकांनी त्यांच्या मूळ गावातील जमिनीची विक्री केल्याने अथवा इतर कारणामुळे गाव सोडून स्थलांतरित झाल्याने आज रोजी सापडत असलेल्या नोंदीची वंशावळ जुळविणे अडचणीचे होत आहे.

३) सापडलेल्या महसुली नोंदीचा आजच्या अर्जदाराच्या पिढीस संबंध प्रस्थापित करणे, बऱ्याच वेळा सगळे पुरावे उपलब्ध होत नाही. परिणामी केवळ अर्जदारांच्या शपथ पत्राच्या आधारे निर्णय घ्यावा लागत आहे.

या अडचणीमुळे जात प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया सुलभ असून देखील नागरिकांमध्ये नकारात्मकता निर्माण होत आहे. त्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याची सध्याची कार्यपद्धती कायम ठेवून ज्या व्यक्तीची भाषा व स्पष्ट होते त्यांना जात प्रमाणपत्र निर्गमित करावी. त्याचबरोबर या पद्धतीत कोणताही बदल न करता कुणबी, मराठा कुणबी, कुणबी मराठा जातीच्या नोंदी संदर्भात वंशावळ सिद्ध करण्यात येत असलेल्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर सदर वंशावळ सिद्ध करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुका निहाय समित्या स्थापन केलेल्या आहेत. ही समिती सहाय्यक करण्यासाठी तालुकास्तरावर स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आलेले आहेत. जातीच्या नोंदी उपलब्ध झालेल्या व्यक्तींच्या मागील समांतर पुढील वंशावळ शक्य तितक्या मर्यादेपर्यंत जुळविण्याचे काम सदर समिती करणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने वंशावळ जुळविणाऱ्या समितीस ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालयात वंशावळ जुळवण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभा करण्यात आलेला आहे. ज्या समाजबांधवांच्या वंशावळी जुळविण्याच्या अडचणी आहेत त्यांनी संबंधित तहसील कार्यालयातील कक्षाला भेट देऊन आपल्या वंशावळी जुळवून घ्याव्यात व प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन मराठा सेवक आनंद भांगिरे यांनी केले आहे.

# प्रदुषण करणाऱ्या वाहनांना इंधन बंदी

आरंभ मराठी / मुंबई



तांत्रिकदृष्ट्या सदोष वाहन चालवून प्रदूषण करणाऱ्या वाहनधारकांना यापुढे पेट्रोल पंपावर इंधन बंदी करण्याचा विचार असुन, लवकरच अशा प्रकारचे धोरण आणण्यात येईल असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. या बैठकीला परिवहन विभागाचे सहसचिव किरण होळकर, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार व इतर अधिकारी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले, . पारंपारिक इंधनावर चालणाऱ्या वाहनांमुळे वायु प्रदूषण वेगाने होते. त्यासाठी राज्य शासनाने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (Pollution Under Control Certificate ) प्रत्येक वाहनाला लागू केले आहे. तथापि, ही प्रमाणपत्रे वाहनधारक चुकीच्या पद्धतीने प्राप्त करून घेतात किंवा सदर प्रमाणपत्र बोगस असल्याच्या देखील तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झालेल्या आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक (Air Quality Index) वेगाने घसरत चालला आहे. त्याला बऱ्याच अंशी तांत्रिक दृष्ट्या सदोष वाहने जबाबदार असल्याचे दिसून येते.त्यामुळे भविष्यात क्विक रिस्पॉन्स कोड (Q. R. CODE. . आधारित प्रदूषण नियंत्रण पत्र देण्यात येणारा असून,प्रत्येक पेट्रोल पंपावर इंधन भरायला येणाऱ्या वाहनाची हवा गुणोत्तर निर्देशकांनुसार तपासणी केली जाईल.ज्यांच्याकडे वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असेल त्यांनाच इंधन दिले जाईल. * No P.U.C. No fuel ... ...* अशा प्रकारचे कडक नियम असणारे धोरण लवकरच परिवहन विभागामार्फत आणण्यात येणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेणे आवश्यक आहे. आपल्या पिढीने भावी पिढीचा देखील विचार केला पाहिजे, त्या पिढीला शुद्ध हवा मिळावी, यासाठी आत्ताच वायु प्रदूषणावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा कडक नियमांची अंमलबजावणी करणे अपरिहार्य असल्याचे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

## जिजाबाई गायकवाड यांचे निधन

आरंभ मराठी/कळंब



कै. लिंबराज आबा गायकवाड यांच्या धर्मपत्नी जिजाबाई लिंबराजआबा गायकवाड (वय ८४) यांचे ५ मे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी मूळगावी भाटशिरपूरा येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, एक मुलगी, नातवंडेअसापरिवारआहे.

# भूम येथील शंकरराव पाटील महाविद्यालयाचा इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९५ टक्के

आरंभ मराठी/भूम



सोमवारी जाहीर झालेल्या बारावीच्या निकालामध्ये भूम येथील शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्के लागला. कला, वाणिज्य व विज्ञान तिन्ही शाखेचा मिळून ९५% निकाल लागलेला आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ९९ टक्के लागलेला आहे. वाणिज्य शाखेमध्ये पवार सोमेश्वर चंद्रकांत हा विद्यार्थी ८६.१७% गुण घेऊन शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालया मधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तर डिसले निकिता विनोद ही विद्यार्थिनी ७६.५० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे. तृतीय क्रमांक बागडे दीक्षा दत्तात्रेय ही विद्यार्थिनी ७६ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९६% लागलेला आहे. यामध्ये सूर्यवंशी श्रेया आनंद ही विद्यार्थिनी ७६ टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे. तर थोरात आकांक्षा माणिक ही ७४ टक्के गुण घेऊन द्वितीय आलेली आहे. तसेच अनुष्का कमलाकर डोके ही विद्यार्थिनी ७३.१७% गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे. कला शाखेचा एकूण निकाल ९१ टक्के लागलेला आहे. यामध्ये शेख सानिया शब्बीर ही विद्यार्थिनी ८७.८३% गुण घेऊन प्रथम क्रमाकाने उत्तीर्ण झाली आहे. तर गायकवाड प्रथमेश बबन हा विद्यार्थी ८४.३३% गुण घेऊन द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तसेच जाधव नोबल नवनाथ हा विद्यार्थी ८२ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य संतोष शिंदे यांनी अभिनंदन केले.

## बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात मोहेकर महाविद्यालयाचे यश

आरंभ मराठी / कळंब

१२ वी बोर्ड परीक्षेचा शि.म.ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयचा निकाल ९५% एवढा लागला असून कला शाखेचा निकाल ९४.८%, वाणिज्य शाखेचा निकाल ९७.५%, विज्ञान शाखेचा निकाल ९४.९१% एवढा लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कला शाखेतील टेकाळे उत्कर्षा (८०.६६%) एवढे गुण घेऊन प्रथम आली असून, माळी ज्योती (८०.५०%) गुण घेऊन द्वितीय क्रमांक, तर पवार स्वेता (७६.५०%) गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेतील हाके कार्तिक (८०%) गुण घेऊन प्रथम क्रमांक, गायकवाड काजल (७९.३३%) गुणांसह द्वितीय तर शिंपले स्वेता (७९.१६%) गुण मिळवत तृतीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेतील साखरे वेदिका (८५%) एवढे गुण घेऊन प्रथम आली असून, कोठावळे अमृता (८२.८३%) गुणांसह द्वितीय तर चोरघडे सुप्रिया (८१.६६%) गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. वोकेशनल कोर्स (एमसीव्हीसी) चा निकाल ९३.७५% एवढा लागला असून जाधव तनुजा (६८.१७) गुणांसह प्रथम, सुतार स्नेहल (६७.८३%) द्वितीय आणि भिसे (६५.५०%) गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. विध्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिल मोहेकर, सचिव डॉ.अशोकराव मोहेकर, संस्थेचे सर्व संचालक व पदाधिकारी, तसेच महाविद्यालचे प्राचार्य डॉ.हेमंत भगवान, उपप्राचार्य मिटकरी अप्पासाहेब, उपप्राचार्य जाधव के.डी., पर्यवेक्षक हंडीबाग के.के तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## कळंब नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निलंबित करा: पांडुरंग कुंभार यांचे निवेदन

आरंभ मराठी/ कळंब



कळंब येथील नगर परिषदच्या मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी आपल्या पदाचा आणि अधिकारांचा गैरवापर करून शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप माजी नगराध्यक्ष पांडूरंग कुंभार यांनी केला आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर करून शासन निर्णयाच्या विरोधात काम करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांवर चौकशी समिती नेमण्याची आणि तात्काळ निलंबनाची मागणी केली आहे. कुंभार यांच्या म्हणण्यानुसार कळंब नगर परिषद हद्दीतील ६८ कोटींच्या नवीन पाणी पुरवठा योजनेंतर्गत रस्ते विकास कामे व जलवाहिनी खोदकामासंबंधीचा शासन निर्णय क्रमांक २३९/ति–३३, दिनांक ११ मे २०१७ च्या अन्वये स्पष्ट निर्देश आहेत की, शहरातील पाणी पुरवठा, जलवाहिनी, मलनिस्सारण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच रस्ते बांधकामे करावीत. परंतु या निर्णयाला डावलून मुख्याधिकारी गुरमे यांनी जाणिवपूर्वक रस्ते विकास कामे सुरू ठेवली असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. या कामांसाठी शासन स्तरावरून निधी उपलब्ध असताना देखील मुख्याधिकाऱ्यांनी नगर अभियंत्याच्या सुचनेविना व केवळ गैरशासकीय संकेतावर कामे सुरू केली. या कामांमुळे भविष्यात पाणी पुरवठा योजनेसाठी रस्ते पुन्हा खोदण्याची वेळ येणार असून, अनावश्यक खर्च होणार आहे. यापूर्वीही विधानसभा अध्यक्षांच्या आदेशानुसार झालेल्या चौकशी समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली नव्हती असाही आरोप केला आहे. मुख्यमंत्री व नगरविकास मंत्र्यांनी या प्रकरणाची गांभिर्याने दखल घ्यावी. शासन निर्णय धाब्यावर बसवणाऱ्या अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई व्हावी आणि चौकशी समिती स्थापन करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी काँग्रेस (आय.) चे तालुका अध्यक्ष पांडुरंग कुंभार यांनी केली आहे.

## शिवाई इन्स्टिट्यूटमध्ये योग मार्गदर्शन शिबिर

आरंभ मराठी /उमरगा



शिवाई चॅरिटेबल ट्रस्ट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी व शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग येथे सोमवारी (दि.५) योग मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बी.एच. बेडदुर्गे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून युवा भारत केंद्रीय प्रभारी पुज्य स्वामी आदित्य देवजी महाराज, पुज्य स्वामी सनातन देवजी महाराज, महाराष्ट्र राज्य युवा प्रभारी अतुलजी आर्य तसेच भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी व्यंकट जवळगे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. विजय बेडदुर्गे, उपाध्यक्ष प्रा.अजय बेडदुर्गे यांची उपस्थिती होती. यावेळी पुज्य स्वामी अदित्य देवजी महाराज यांनी विद्यार्थ्यांना योग व आपल्या जीवनातील सकारात्मक बदल याबद्दल सखोल माहिती दिली. योगाने शरीर तर निरोगी राहतेच त्याबरोबर मन प्रसन्न राहण्यास मदत होते. शरीरामध्ये सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. ी. जीवनात यशस्वी होण्याबरोबर आरोग्य उत्तम राखणे गरजेचे आहे असे यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य महेश कदारे, डॉ.अश्विनी सुर्यवंशी, परीक्षित शिरूरे, किरण पांचाळ, फुलचंद काजळे, श्रीकृष्ण मुळे, धनश्री भुजंगे, अंकिता यादव, शितल शेळके, संतोष जाखोटीया, अशोक गायकवाड, वैष्णवी फुगटे, मंजुषा गव्हाळे, ओमकार पाटील, प्रशांत वाघमारे, शुभम सूर्यवंशी,अविनाश चौधरी, अभिजीत पाटील, शहाबाज शेख, औदुंबर जाधवर, अविनाश कुंभार, शुभांगी बंदीछोडे, निलोफर शेख, मोनिका धुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्राचार्य महेश कदारे यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

# बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात श्रीपतराव भोसले हायस्कूलची बाजी; ४६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

## ७६७ विद्यार्थ्यांपैकी ७४८ विद्यार्थी उत्तीर्ण

आरंभ मराठी / धाराशिव



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत श्रीतपराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने लातूर विभागात आपल्या दैदिप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील १२ वी बोर्ड परीक्षेसाठी सर्वाधिक विद्यार्थी संख्या असूनही उल्लेखनीय यश विद्यालयाने मिळविले आहे. विज्ञान शाखेतून एकूण ७६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिलेली होती, त्यापैकी ७४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यातील ३१ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. या शाखेचा सरासरी निकाल ९७.५२% एवढा आहे. विज्ञान शाखेमधून प्रथम क्रमांक कु. शेख मिजबा दाऊद शेकड़ा ८९ .१७% व्दितीय कु.कुलकर्णी विनीता दत्तात्रय ८८. १७% तसेच तृतीय क्रमाक बुर्ले अजिंक्य बिभीषण ८६.८३% प्राप्त केले. विद्यालयाच्या कला शाखेतुन १९९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी १५९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. त्यातील ६ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. या शाखेचा सरासरी निकाल ७९. ८९% एवढा आहे. कला शाखेमधुन प्रथम क्रमांक कु.पटेल दिक्षा रामप्रसाद ८५. ३३%, व्दितीय कु. सांगळे अंजली गोपीनाथ ८२ . ३३%, तृतीय कु.भोसले श्रेया रविंद्र ८० .००% आहे. तसेच वाणिज्य शाखेतून १०४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी ९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यातील ९ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या शाखेचा सरासरी निकाल ८९ . ४२% एवढा आहे. वाणिज्य शाखेमधुन प्रथम क्रमांक कु.डोंगरे आरती अरुण ९२. ३३%, व्दितीय क्रमांक कु.थोरात क्रांती सुधाकर ९१. १७ %, व तृतीय क्रमांक कु.कसबे ऋतुजा अविनाश ८९. ३३% आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष सुधीर पाटील यांनी अभिनंदन केले. यावेळी सरचिटणीस प्रेमाताई सुधीर पाटील, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी एस. एस. देशमुख, प्राचार्य एन. आर. नन्नवरे, उपप्राचार्य एस. के. घार्गे , पर्यवेक्षक एम.व्ही. शिंदे, फोटॉन बॅचचे प्रमुख ए. व्ही. भगत , फेनॉमेनाल बॅचचे प्रमुख जे. एस. पाटील तसेच सर्व प्राध्यापक, विषयप्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## येणेगुर येथील कॅप्टन जोशी विद्यालयाचा बारावीचा निकाल ८८.६७ टक्के

आरंभ मराठी/आलूर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील कॅप्टन जोशी स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील यावर्षीचा बारावीचा निकाल ८८.६७ टक्के इतके लागला आहे. प्रशालेतून एकूण ४३ विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म भरले होते. त्यापैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुस्कान अल्ताफ तांबोळी व स्नेहा महादेव कांबळे या दोन विद्यार्थिनींनी ७०.६७ टक्के मार्क घेऊन प्रशालेतून प्रथम क्रमांक पटकावले आहे. गणेश रमेश बिराजदार या विद्यार्थ्यांने ६९.५० टक्के मार्क घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर राधिका रवींद्र कळके या विद्यार्थिनींनी ६९ टक्के मार्क घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मिळालेल्या यशाबद्दल श्री परमहंस शिक्षण संस्थेचे सचिव बी.ए. बिराजदार, अध्यक्ष देवराज बिराजदार, प्रशालयाचे प्राचार्य महेश हरके, संचालक शंकर हुळमजगे, आनंदराज बिराजदार, प्रशालेतील परीक्षा विभाग प्रमुख महेश खंडाळकर, महेश बिराजदार, सुरेश जाधव व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

# शिराढोणच्या शरदचंद्र महाविद्यालयात चार हजार वृक्षांचे संगोपन; परिसर हिरवाईने नटला

## पंचवीस वर्षात महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसह हजारो वृक्ष घडवले

### शिक्षणासोबत विद्यार्थ्यांवर केले जातात वृक्ष संवर्धनाचे संस्कार

अमोलसिंह चंदेल / आरंभ मराठी

शिराढोण-कळंब तालूक्यातील शिराढोण येथे ग्रामीण विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण घेण्यासाठी हिंदूस्थानी एज्यूकेशन सोसायटी औसाव्दारा संचलित संस्थेचे संस्थापक स्व.एन.बी. शेख व त्यांचे चिरंजीव प्रा.डॉ. अफसर शेख यांनी शिराढोणसारख्या ग्रामीण भागात शरदचंद्र महाविद्यालयाचे सन २००१ साली छोटेसे रोपटे लावले होते. या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले असून, या महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. साजेद चाहूस यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या परिश्रमातून महाविद्यालयाच्या परिसरात ४ हजार २३२ वृक्षाचे संगोपन होत आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे महाविद्यालयात वृक्षांची जोपासना केली जात असल्यामुळे परिसर निसर्गरम्य वातावरणाने फुलून गेला आहे.







अतिशय निसर्ग रम्य अशा वातावरणात या महाद्यालयात शिक्षण, क्रीडा तसेच सांस्कृतीक विभाग यामध्ये विद्यार्थी आपले शिक्षण पुर्ण करत आहेत. ग्रामीण व शहरी अशी पडलेली दरी दूर करण्यासाठी शिराढोण येथे शिराढोण व परिसरातील विद्यार्थ्यांचे पदवीचे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी सन २००१ साली हिंदूस्थानी एज्यूकेशन सोसायटी औसा व्दारा संचलित या संस्थेचे संस्थापक स्वर्गीय एन.बी. शेख व संस्थेचे सचिव प्रा.डॉ.अफसर शेख यांनी प्रयत्न करुन शदरचंद्र महाविद्यालयाची स्थापना केली. अतिशय संघर्षमय प्रवासातून या महाविद्यालयाची वाटचाल सुरु झाली. ग्रामीण भागात हे महाविद्यालय सुरू झाल्याने गाव व परिसरातील विद्यार्थ्यांची सोय झाली. सन २००१ साली महाविद्यालयाची स्थापना झाल्यानंतर संस्थापक अध्यक्ष एन.बी.शेख व प्रा.डॉ.अफसर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.साजेद चाहूस यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाकडे सातत्याने लक्ष दिले. या महाविद्यालयाला आज नॅक मानांकन 'ब' दर्जा प्राप्त आहे. ग्रामीण भागातील असूनही या महाविद्यालयाने नॅक कमिटी समोर आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाच्या माध्यमातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. दरवर्षी या महाविद्यालयात सामाजिक वनीकरण विभाग कळंब व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रकारच्या रोपांचे वृक्षरोपन केले जाते. तसेच या रोपांचे संगोपणही केले जाते. महाविद्यालयाची ईमारत शिराढोण रायगव्हाण रोडवर अतिशय निसर्गरम्य अशा वातावरणात आहे. महाविद्यालयात दरवर्षी केलेल्या वृक्षांचे व्यवस्थित संगोपन केल्याने आज महाविद्यालय परीसरात ४ हजार २३२ वृक्ष जिवंत असून त्याचे संगोपन सातत्याने होत आहे.

### उन्हाळयात वृक्षांना टँकरव्दारे पाणी

महाविद्यालय परीसरात असलेल्या विविध प्रकारच्या वृक्षांना जगवण्यासाठी वर्षभर सातत्यपूर्ण प्रयत्न सुरुच असतात. परंतु, उन्हाळयातही यांना जगवण्यासाठी टँकर व्दारे पाणी पुरवठा केला जातो. उन्हाळयाच्या सुट्टीमध्येही महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना नियोजनपूर्वक काम देवून टँकरव्दारे या वृक्षांना पाणीपुरवठा करण्याचे काम सुरू असते.

### ग्रीन क्लबच्या माध्यमातून विविध कार्यक्रम

महाविद्यालयात ग्रीन क्लबच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रम घेण्यात येतात. यामध्ये वृक्षांचे महत्व, वृक्षारोपण आदी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. दर वर्षी १ जुलै ते ७ जलै दरम्यान वन सप्ताहाचेही आयोजन करण्यात येते. पर्यावरण संवर्धन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचेही आयोजनही करण्यात येते. विविध उपक्रम राबविण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांमध्ये वृक्ष लागवडीची गोडी निर्माण होते.

### अशी आहे महाविद्यालयाची वृक्षप्रेमी टीम

शिराढोण येथील शरदचंद्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजेद चाहूस यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.के.जी.घोलप, डॉ.ए.आय. शेख, डॉ.आर.आर.भिसे, डॉ.झेड.ए.काझी, डॉ.ए.एफ.सय्यद, डॉ.एस.एम.पटेल, डॉ.के.एम.शकिलोद्दीन, डॉ.एम.बी.शिरमाळे, डॉ.एस.एम.दळवे, डॉ.ए.एच.आत्तार, डॉ.एस.व्ही.खोंड, डॉ.आर.आर.सय्यद, एस.एन. सय्यद, डॉ.पी.यु.गंभिरे, एस.पी.अडसुळे, डॉ.एफ.ए.तांबोळी, डॉ.एस.एम.आल्टे, बि.एम.नळगे, एस.एन.मोगल,एस. एस.पटेल, झेड.एस.काझी, एस.आर.कापसे, आर.एन.शेख, जि.बी.काझी, एल.के.सोळंके, आय.एस.तांबोळी हे सर्व सातत्याने शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, विविध विषय, पर्यावरण, वृक्षसंगोपन यावर सातत्याने परीश्रम घेतात.

## वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्याबद्दल डॉ. स्नेहा विटकर यांचा सत्कार



आरंभ मराठी / परंडा

परंडा येथील परंडा व्यापारी महासंघाचे सचिव हनुमंत विटकर यांची कन्या डॉ. स्नेहा हनुमंत विटकर यांनी वैद्यकीय शिक्षण बीएएमएस विशेष प्राविण्यासह पूर्ण केल्याबद्दल परंडा तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने डॉ. स्नेहा विटकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परंडा व्यापारी महासंघाचे कायम निमंत्रित सल्लागार परंडा तालुका व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष हाजी वाजिद भाई दखनी, परंडा तालुका व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष तनवीर डोंगरे, जिल्हा व्यापारी महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष अभय शेठ देसाई, परंडा व्यापारी महासंघाचे सचिव हनुमंत विटकर, आनंद विटकर, मतीन डोंगरे, गोरख देशमाने , जितेंद्र हरियाणी, मन्सूर बहिरे, सरफराज खरपुडे, तनवीर हावरे, सरफराज करपुडे या व्यापारी मान्यवरांच्या हस्ते डॉ. स्नेहा विटकर यांचा सत्कार करण्यात आला.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

आरंभ मराठी / धाराशिव




राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समिती धाराशिवच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या १०३ व्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी (दि.६) ध्वजास वंदन केले. यावेळी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून गुलाबपुष्प वाहण्यात आले. यावेळी विक्रम (भैय्या) पाटील, पृथ्वीराज चिलवंत, बालाजी तांबे यांनी शाहू महाराजांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. या अभिवादन कार्यक्रमास राजर्षी शाहू महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष बलराज रणदिवे, संदीप इंगळे, विजयकुमार गायकवाड, रघुनाथ गायकवाड, सतीश घोडेराव, कुणाल निंबाळकर, रोहित पडवळ, राजसिंह राजेनिंबाळकर, मुकुंद घाडगे, सिद्धार्थ बनसोडे, सुशील गडकर, स्वराज जानराव, आकाश मुंडे, ऋषिकेश शिंदे, सचिन लोंढे, अमोल पाटील, यासेर बिराजदार, प्रशांत सावंत, संदीप शिंदे, दत्तात्रय वीर, अमजद सय्यद, महादेव घायतिडक आदीसह अनेक जण उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजर्षी शाहू महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष बलराज रणदिवे यांनी तर सूत्रसंचालन सचिव बालाजी तांबे यांनी केले. आभार पृथ्वीराज चिलवंत यांनी मानले.

## उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने उज्ज्वल निकालाची परंपरा यंदाही कायम राखली; महाविद्यालयाचा निकाल ९३.३३%

आरंभ मराठी / उमरगा

उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने उज्ज्वल निकालाची आपली परंपरा यंदाही कायम राखली आहे. फेब्रुवारी/ मार्च २०२५ च्या बारावी बोर्ड परीक्षेत महाविद्यालयाचा एकूण निकाल ९३.३३% इतका लागला आहे. यामध्ये बिराजदार आशुतोष अर्जुन आणि पाटील हर्षवर्धन सचिन हे विज्ञान शाखेचे दोन विद्यार्थी ८६.३३% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम आलेले आहेत. गुणवत्तापूर्ण निकाल असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या यावर्षी परीक्षेस बसलेल्या एकूण १०७३ विद्यार्थ्यांपैकी ९८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामध्ये ११० विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९६.८६% इतका असून त्यामध्ये बिराजदार आशुतोष अर्जुन (८६.३३%), पाटील हर्षवर्धन सचिन (८६.३३%), साळुंखे शुभम महेश (८५.३३%), पठाण झोया कलीम (८४%) यांच्यासह एकूण ९८ विद्यार्थी डिस्टिंक्शन मध्ये उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा एकूण निकाल ८०.५६% लागला असून तांबोळी हुमेनूर मेहबूब ही विद्यार्थिनी ८१% मिळवून कला शाखेतून प्रथम आली आहे. तसेच सुरवसे समीक्षा संजय (७८.१७%), कांबळे मंगेश बसवेश्वर (७६%) यांच्यासह ४ विद्यार्थी डिस्टिंक्शन मध्ये आले आहेत. वाणिज्य शाखेचा निकाल ९४.४४% लागला असून मोरे वनिता मगर (८३.१७%) ही शाखेत प्रथम आली आहे. त्याचबरोबर मुगळे वैभवी हणमंत (८०.१७%), पाटील शुभम प्रीतम (७८.८३%), आदी ८ विद्यार्थी डिस्टिंक्शन मध्ये आले आहेत. तसेच महाविद्यालयातील एमसीव्हीसी शाखेचा निकाल ९०.१४% लागला आहे. त्यामध्ये बनसोडे आदित्य गणेश (६६.३३%), परीट केदार दत्तात्रय (६४.१७%), बुंडगे प्राजक्ता विजयकुमार (६३.५०%) हे गुणानुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय आले आहेत. वभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल भैया मोरे, उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे, संस्थेचे इतर पदाधिकारी, प्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले, उपप्राचार्य डॉ पी.ए. पिटले, उपप्राचार्य डॉ व्ही. एस. इंगळे उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा. एस. ए. महामुनी, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे आदींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## अपसिंगा-तुळजापूर रस्त्याचे काम रखडले; नागरिकांची प्रचंड गैरसोय

आरंभ मराठी / तुळजापूर



सार्वजनिक बांधकाम विभाग तुळजापूर यांच्या कार्यलयामार्फत होत असलेल्या तुळजापूर ते अपसिंगा रखडलेल्या रस्त्याच्या डांबरीकरण कामाला कोणीच मनावर घेत नसल्याचे दिसून येत आहे. या रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या अवस्थेत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या दोन वर्षापासून अपसिंगा ते तुळजापूर रस्त्याचे डांबरीकरण काम सुरू आहे. मात्र मनमानी कारभारामुळे अनेक ठिकाणी काम अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. यामुळे अनेकांना खराब रस्त्यामुळे पाठीचे, मणक्याचे आजार उद्भवत आहेत. या महत्वाच्या प्रश्नाकडे, खासदार, आमदारांचे दुर्लक्ष होत असल्याने लोकांतून संताप व्यक्त होत आहे. तसेच हे काम तात्काळ सुरु करुन पुर्ण करण्याची मागणी होत आहे.

### दोन दिवसात काम सुरु होणार

तुळजापूर तालुक्यातील काटी परिसरात काम चालू आहे. त्यामुळे मशीन त्याकामावर चालू आहे. आगामी दोन दिवसात तुळजापूर - अपसिंगा या ८ किमी अंतराच्या रखडलेलेल्या डांबरीकरणास सुरुवात करणार आहेत.

विजय आवाळे,
उपविभागीय अधिकारी
सार्वजनिक बाधकाम विभाग तुळजापूर.

## नवनीत चित्रकला स्पर्धेचे भोसले हायस्कूलमध्ये बक्षीस वितरण



आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहरातील श्रीपतराव भोसले हयस्कूलमध्ये राष्ट्रीय स्तरीय नवनीत चित्रकला स्पर्धेत बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्था संचालक फुलचंद गाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र, चित्रकला उपयुक्त साहित्य बक्षीस वितरण करण्यात आले. नवनीत मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक इयत्ता सातवीत शिकत असलेली कु. पलाशा नलावडे, द्वितीय शिव न्या चव्हाण, तृतीय योग्यता गरड, मार्गदर्शक कलाध्यापक शेषनाथ वाघ यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य तथा मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, संस्था संचालक के.के .जाधव, माजी उपमुख्याध्यापक सिध्देश्वर कोळी, पर्यवेक्षक यशवंत इंगळे, राजेंद्र जाधव, सुनिल कोरडे, निखीलकुमार गोरे, धनंजय देशमुख, श्रीमती बी.बी. गुंड, कलाविभागप्रमुख शिवाजी भोसले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## श्री तुळजाभवानी सैनिक स्कूलचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के

आरंभ मराठी / तुळजापूर









तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा २०२४- २५ चा बारावी परीक्षेचा निकाल प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शंभर टक्के लागला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मधील एचएससी परीक्षेत एकूण ३० विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणानुक्रमे गिरी प्रद्युम्न कमलाकर (८३.८३%), रुपनर हर्षद सुरेश (७७.३३%), सुरवसे मंथन धनंजय (७६.३३%) या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. शाळेतील ३० विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्याने ४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. बारावी परीक्षेतील सर्व उत्तीर्ण व यशस्वी विद्यार्थ्यांचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, आमदार राणाजगजितसिंह पाटील, तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे, सैनिक स्कूलचे कमांडट कर्नल मकरंद देशमुख व विद्यालयाचे प्राचार्य वैजनाथ घोडके इत्यादींनी सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे व पालकांचे हार्दिक अभिनंदन केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## नारीशक्ती पुरस्काराने ज्ञानेश्वरी शिंदे यांचा गौरव

### सर फाउंडेशन व महाराष्ट्र टीचर फोरमकडून झाला सन्मान

आरंभ मराठी/तुळजापूर




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी ता. तुळजापूर येथील सहशिक्षिका ज्ञानेश्वरी शिंदे यांना स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय नारीशक्ती पुरस्कार २०२५ सोलापूर येथील रंगभवन सभागृहात एका गौरवशाली सोहळ्यात प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रिसिजन अध्यक्ष सुहासिनी शहा, प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरचे शिक्षणाधिकारी कादर शेख, माजी प्रशासकीय अधिकारी डॉ. सुजाता लोहकर, डॉ. शशिकांत शिंदे, सिद्धाराम माशाळे, हेमा शिंदे, बाळासाहेब वाघ, गुणवंत चव्हाण या मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. शिंदे यांनी केवळ शालेय अभ्यासक्रमाचे अध्यापन न करता विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्यांची जाणीव निर्माण करणारे विविध उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या अध्यापनशैलीत नाविन्यपूर्णता आणि प्रयोगशीलता यांचा समावेश असून, त्यांनी स्वनिर्मित व्हिडिओंचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक रंजक आणि समजण्यास सोपे केले आहे. तसेच, टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचे उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणारे ठरले आहेत. त्यांनी सहकाऱ्यांच्या सोबतीने बालवाचनालय स्थापन करून पूरक अध्ययनाची संकल्पना राबविली, जे विद्यार्थ्यांना अधिक वाचनाभिमुख आणि ज्ञानसंपन्न बनविण्यात मदत करते. या उपक्रमांमधून विद्यार्थी स्व-अध्ययन, अनुभवाधारित शिक्षण आणि मूल्यसंस्कार आत्मसात करीत आहेत. पीएम ई विद्या अंतर्गत व्हिडिओ निर्मितीमध्ये आदर्श पाठ सादर केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रयोगशीलता व आत्मविश्वास वाढीस लागला आहे. विद्यार्थ्यांची आवड व त्यांचे अनुभवविश्व यांची जोड त्यांच्या शैक्षणिक कार्यात दिसून येते. त्यांच्या या समर्पित कार्याची दखल घेत सर फाउंडेशनने त्यांची 'राज्यस्तरीय नारीशक्ती पुरस्कार २०२५' साठी निवड केली. हा पुरस्कार त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करणारा असून, त्यांच्या कार्याची प्रेरणा इतर शिक्षकांसाठीही मार्गदर्शक ठरेल अशी आहे.या पुरस्काराबद्दल गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव, केंद्रप्रमुख शारदा चव्हाण ,मुख्याध्यापक सोमदेव गोरे , महादेव वाघमारे , स्मिता पाटोळे , प्रणिता कांबळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सहकारी शिक्षक, पालक, विद्यार्थी व गावकरी वर्ग तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कळंब येथे अंनिसचा जिल्हा प्रेरणा मेळावा; अंनिसचे राज्य पदाधिकाऱ्यांचे मेळाव्याला मार्गदर्शन



आरंभ मराठी / कळंब

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) धाराशिवचा जिल्हा प्रेरणा मेळावा शनिवारी (दि.३) कळंब शहरातील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या प्रेरणा मेळाव्यास अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य सरचिटणीस सुधाकर काशिद, रुक्साना मुल्ला हे उपस्थित होते. या सभेमध्ये शहादा जि. नंदूरबार येथे होणाऱ्या विस्तारीत राज्य कार्यकारिणीस उपस्थित राहण्याबाबत तसेच जिल्हा कार्यकारिणी निवड प्रक्रिया, जबाबदारी, माहिती, जिल्हा कार्यकारिणी निवड प्रक्रिया घोषणा, कार्यकर्ता प्रशिक्षण घेणे आदी विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच पदाधिकाऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न केले गेले. जिल्हा कार्यकारिणी सदस्य, सर्व शाखा कार्याध्यक्ष, सचिव व सर्व कार्यकर्ते या मेळाव्यास उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष अड. अजय वाघाळे, जिल्हा कार्याध्यक्ष अरविंद शिंदे, जिल्हा प्रधान सचिव वामन पंढागळे यांच्यासह प्रतिभा भवार, प्राजक्ता पाटील, जगदीश गवळी, वर्षा सरवदे, बालाजी राऊत, आदिनाथ खराडे, संतोष लिमकर, किरण बारकुल, प्रताप शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## नाईचाकूर येथील श्री शरदचंद्रजी पवार महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९१.९४ टक्के

आरंभ मराठी/ उमरगा

उमरगा तालुक्यातील नाईचाकूर येथील समाजसेवा शिक्षण संस्था संचलित श्री शरदचंद्रजी पवार स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा निकाल ९१.९४ टक्के निकाल लागला आहे. यामध्ये विज्ञान शाखेचा निकाल ९६.४२ टक्के तर कला शाखेचा ७२ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान साक्षी प्रभाकर जाधव ८३% गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम आली. द्वितीय क्रमांक श्रुतिका वसंत होगाडे ८१.३३%, तृतीय क्रमांक प्रार्थना विक्रम पवार ७९% यांनी यश मिळवले. कला शाखेचा निकाल ७२ % लागला आहे. महाविद्यालयातून कला शाखेतून प्रथम येण्याचा मान अमित आनंद सोनटक्के ७३.५०%, द्वितीय क्रमांक रूपाली शंभुलिंग बिराजदार ६७%, तृतीय क्रमांक प्रियांका व्यंकट कळसे ६५% यांनी पटकावला. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे समाजसेवा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव सदाशिव पवार, उपाध्यक्ष गोविंदराव बळीराम काळे, सचिव दिलीपराव सदाशिवराव पवार, प्राचार्य व्यंकटराव मोहनराव जाधव, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी समाजसेवा शिक्षण संस्थेचे सर्व संचालक मंडळ या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.